| | |
|---|---|
| **MHPU26-001327-2008** | **दाखल दिनांक** – १८/०८/२००८<br>**नोंदणी दिनांक** – १८/०८/२००८<br>**निकाल दिनांक** – ११/०८/२०**२६**<br>**कालावधी** – १७ **व. ११ म. २४ दि.** |

**(भाग – अ)**

**<u>४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात वडगांव मावळ, पुणे</u>**

**(पिठासन अधिकारी :- व्ही. आर. डोईफोडे)**

**नि.फौ.ख.क्र.३०७/२००८**

**नि.क्र.३६.**

**अभियोगपक्ष** - **महाराष्ट्र शासन,**
**पोलीस स्टेशन अधिकारी,**
**वडगाव मावळ पोलीस स्टेशन, पुणे**
**(गु.र.क्र.९१/२००८)**

**अभियोगपक्षातर्फे** - **सहाय्यक सरकारी अभियोक्ता -**
**श्री. एस. एस. पवार**

**-<u>विरुध्द</u>-**

**आरोपी क्र.** **१) संदिप रामदास मोरे,**
**वयः** २६ वर्षे, **व्यवसायः** शिक्षण,
**रा.** दिवड, ता.मावळ, जि.पुणे.

**२) रामदास दशरथ मोरे,**
**वयः** ६२ वर्षे, **व्यवसायः** शेती,
**रा.** दिवड, ता.मावळ, जि.पुणे.

**३) रतन बबन सावळे,**

**वयः** ३२ वर्षे, **व्यवसायः** शेती,

**रा.** दिवड, ता.मावळ, जि.पुणे.

**४) राजु यशवंत सावळे,**

**वयः** २९ वर्षे, **व्यवसायः** शेती,

**रा.** दिवड, ता.मावळ, जि.पुणे.

**आरोपी तर्फे विधिज्ञ - श्री.एस. डी. काळे,**

**(भाग – ब)**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची तारीख** | दि.२३/०६/२००८ |
| **फिर्याद दिल्याची तारीख** | २४/०६/२००८ |
| **गुन्हयाचा तपशील दाखल तारीख** | ११/०८/२०२६ |
| **पुरावा सुरु झाल्याची तारीख** | ११/०८/२०२६ |
| **न्यायनिर्णयासाठी प्रकरण ठेवल्याची तारीख** | ११/०८/२०२६ |
| **न्यायनिर्णयाची तारीख** | ११/०८/२०२६ |
| **आरोपीला शिक्षा ठोठावली असेल तर, त्याची तारीख** | निरंक |

**आरोपींचे तपशील)**

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | आरोपीवर ठेवलेले दोषारोप | आरोपीला निर्दोष किंवा दोषी ठरविल्याची तारीख | शिक्षा लादलेला असल्यास | शिक्षा वजावट केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **संदिप रामदास मोरे,** | २६/०६/२००८ | २६/०६/२००८ | भा.दं.वि. कलम ३२५,३२३,४५२,४२७,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष ठरविल्याची तारीख ११/०८/२०२६ | निरंक | निरंक |
| २. | **रामदास दशरथ मोरे,** | २६/०६/२००८ | २६/०६/२००८ | भा.दं.वि. कलम ३२५,३२३,४५२,४२७,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये | ११/०८/२०२६ | निरंक | निरंक |
| ३. | **रतन बबन साबळे,** | २६/०६/२००८ | २६/०६/२००८ | भा.दं.वि. कलम ३२५,३२३,४५२,४२७,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये | ११/०८/२०२६ | निरंक | निरंक |
| ४. | **राजु यशवंत साबळे,** | २६/०६/२००८ | २६/०६/२००८ | भा.दं.वि. कलम ३२५,३२३,४५२,४२७,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये | ११/०८/२०२६ | निरंक | निरंक |

**(भाग – क)**

**(अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी)**

| साक्षीदाराचे अ.क्र. | पुराव्याचा तपशील | नाव |
|---|---|---|
| **१.** | **नि क्र. ३३** | **संतोष बबन सावळे,** |

आरोपीतर्फे तोंडी पुरावा देण्यात आलेला नाही.

**(अभियोगपक्षातर्फे/आरोपीतर्फे पुरावा निशाणी क्रमांक यादी)**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | **नि.३४** | खबरेवरील सहीस |

आरोपीतर्फे लेखी पुरावा देण्यात आलेला नाही.

**(मुद्देमाल)**

| अ.क्र. | मुद्देमालाचे वर्णन | मुद्देमाल जप्त क्रमांक |
|---|---|---|
| **१.** | दोन बांबूच्या काठया | ५६/२००८ |
| **२.** | एक लोखंडी पट्टी | ५६/२००८ |

**न्यायनिर्णय**

**(घोषित दिनांक ११/०८/२०२६)**

आरोपी हे भारतीय दंड विधान कलम ३२५,३२३,४५२,४२७,५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे संपरिक्षेस सामोरे जात आहेत.

**अभियोगपक्षातर्फे घटनेबाबत थोडक्यात हकीकत अशी की,**

**०२.** दि.२३/०६/२००८ रोजी रात्री २३.०० वाजण्याच्या सुमारास मौजे दिवड गावचे हद्दीत आरोपींनी आपआपसांत संगनमत करुन फिर्यादी संतोष बबन साबळे यांचे राहते

घरात अनाधिकाराने प्रवेश करुन फिर्यादीने दि. २१/०६/२००८ रोजी झालेल्या सरपंच पदाचे निवडणुकीत सौ. सविता संतोष सावळे यांची सरपंच पदावर निवड झाल्याने गावात फटाका उडविला याचा राग मनात धरुन फिर्यादीचे घरातील आई, वडील व पत्नीस हाताने, काठीने मारहाण करुन शिवीगाळ दमदाटी करुन आरोपी क्र. ४ राजु सावळे याने फिर्यादीचे वडील बबन सखाराम सावळे यांना हातातील लोखंडी पट्टीने दोन्ही पायावर तसेच डावे खांदयावर मारहाण करुन डावे खांदयाचे हाड फ्रॅक्चर करुन आपखुशीने दुखापत करुन घराबाहेर लावलेली हिरो होंडा मो. सा. क्र. एम एच १४ बी ७६२६ ची मोडतोड करुन नुकसान केले. सबब, खबरीने दि.२४/०६/२००८ रोजी आरोपींविरुध्द खबर दिल्यानुसार **गुन्हा रजिस्टर क्रमांक. ९१/२००८** नुसार वडगाव मावळ पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदवण्यात आला.

**<u>गुन्ह्याचा तपास :</u>**

**०३.** सदर गुन्हयाचा तपास पो. ह. एस. डी. आढारी यांनी केला. तपासी अंमलदार यांनी तपासादरम्यान मुद्देमाल जप्त केला, आरोपींना अटक केले. साक्षीदारांचे जबाब नोंदवले व आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने आरोपी यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**<u>गुन्हयाचा तपशील व प्रतिकथन :</u>**

**०४.** आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२५, ३२३, ४५२, ४२७, ५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये अनुक्रमे नि क्र. २६ दोषारोपपत्र नोंदवण्यात आले. आरोपीने गुन्हा अमान्य केला व संपरिक्षेची मागणी केली. तसेच आरोपीचे निवेदन अनुक्रमे निशाणी २७ ते ३० वर गुन्ह्याचा तपशील नोंदवण्यात आला.

**<u>आरोपीचा जबाब व त्यांचा बचाव</u>** :

**०५.** आरोपींविरूद्ध अभिलेखावर पुरावा न मिळून आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदवण्यात आले नाही.

**<u>पुरावा :</u>**

०६. सरकार पक्षाने आपली कथने शाबीत करणेकरिता साक्षीदार खबरी सा. क्र. १ संतोष बबन सावळे यास नि. क्र. ३३ वर तपासले. साक्षीदार क्र. १ याने

अभियोगपक्षाच्या कथनास सहाय न केल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींनी त्याच्या बचावार्थ स्वतःची अथवा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवली नाही.

**युक्तीवाद :**

**०७.** सुज्ञ सरकारी विधीज्ञ श्री. एस. एस. पवार यांनी असा युक्तीवाद केला की, खबरी अभियोग पक्षाच्या कथनास सहाय न केल्यामुळे योग्य ते आदेश पारित करण्यात यावे असा युक्तीवाद केला. आरोपींचे विदवान वकिल श्री. एस. डी. काळे यांनी असा युक्तीवाद केला की, खबरी साक्षीदार क्र. १ याने अभियोगपक्षाच्या कथनास सहाय न केल्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता करावी.

**मुद्दे :-**

**०८.** आरोपींवर ठेवण्यात आलेला दोषारोपपत्र, अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेला मौखिक पुरावा व दोन्ही पक्षांचा युक्तीवाद पाहता खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले व त्यांचे निष्कर्ष व कारणे व अंतिम निर्णय मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, दि.२३/०६/२००८ रोजी रात्री २३.०० वाजण्याच्या सुमारास मौजे दिवड गावचे हद्दीत आरोपींनी आपआपसांत संगनमत करुन फिर्यादी संतोष बबन साबळे यांचे राहते घरात त्यांना मारहाण करण्याची पुर्व तयारी करुन अनाधिकाराने प्रवेश केला व त्यायोगे **भा.द.वि. कलम ४५२ सह कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | **नाही...** |
| २. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी आपआपसात संगनमत करुन फिर्यादी संतोष साबळे यांचे वडिलांना आरोपी क्र.४ राजु साबळे याने हातातील लोखंडी पट्टीने दोन्ही पायावर, डावे खांदयावर मारहाण करुन डाव्या खांदयाचे हाड मोडले व त्या | **नाही...** |

| | | |
|---|---|---|
| | योगे **भारतीय दंड विधान संहिता कलम ३२५ सह कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | |
| ३. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी आपआपसात संगनमत करुन फिर्यादी संतोष साबळे, त्याचे आई वडिल तसेच पत्नीस हाताने व काठीने मारहाण केली व त्या योगे **भारतीय दंड विधान संहिता कलम ३२३ सह कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | **नाही...** |
| ४. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी आपआपसात संगनमत करुन फिर्यादीच्या घराबाहेर लावलेली हिरो होंडा मोटरसायकल नोंदणी क्र. एम एच १४ बी ७६२६ ची तोड फोड करुन ५० रुपयांपेक्षा जास्तचे नुकसान केले व त्यायोगे **भा.द.वि. कलम ४२७ सह कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | **नाही...** |
| ५. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी आपआपसात संगनमत करुन फिर्यादीस शांतताभंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने शिवीगाळ करुन अपमान केला व त्या योगे तुम्ही **भा.द.वि. कलम ५०४ सह कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | **नाही...** |
| ६. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी आपआपसात संगनमत करुन फिर्यादीस व साक्षीदार यांना शिवीगाळ व दमदाटी केली व त्यायोगे तुम्ही **भा.द.वि. कलम ५०६ सह कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | **नाही...** |
| ७. | काय आदेश? | **अंतिम आदेशा प्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**०९.** अभियोगपक्षाच्या कथनांनुसार दि.२३/०६/२००८ रोजी रात्री २३.०० वाजण्याच्या सुमारास मौजे दिवड गावचे हद्दीत आरोपींनी आपआपसांत संगनमत करुन फिर्यादी संतोष बबन साबळे यांचे राहते घरात अनाधिकाराने प्रवेश करुन फिर्यादीने दि. २१/०६/२००८ रोजी झालेल्या सरपंच पदाचे निवडणुकीत सौ. सविता संतोष सावळे यांची सरपंच पदावर निवड झाल्याने गावात फटाका उडविला याचा राग मनात धरुन फिर्यादीचे घरातील आई, वडील व पत्नीस हाताने, काठीने मारहाण करुन शिवीगाळ दमदाटी करुन आरोपी क्र. ४ राजु सावळे याने फिर्यादीचे वडील बबन सखाराम सावळे यांना हातातील लोखंडी पट्टीने दोन्ही पायावर तसेच डावे खांदयावर मारहाण करुन डावे खांदयाचे हाड फ्रॅक्चर करुन आपखुशीने दुखापत करुन घराबाहेर लावलेली हिरो होंडा मो. सा. क्र. एम एच १४ बी ७६२६ ची मोडतोड करुन नुकसान केले हे निःसंशयपणे शाबीत करणे आवश्यक आहे.

**<u>मुद्दा क्र.१ ते ६ करीता</u> :-**

**१०.** अभियोगपक्षातर्फे खबरी साक्षीदार क्र. १ संतोष बबन सावळे (साक्षीदार क्र.१/नि.३३) याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, सन २००८ मध्ये सायंकाळी १०-११ वाजण्याच्या सुमारास तीन चार लोक तोंड बांधून त्यांच्या घरी आले होते, सदर चार इसमांनी त्यांचा दरवाजा ठोठावला व त्यांना मारहाण चालू केली, त्याने आरोपींविरुध्द गैरसमजुतीमुळे फिर्याद दिली होती आरोपींनी त्याला, त्याच्या वडिलांना मारहाण केली असे काही घडले नव्हते. सरकार पक्षास सहकार्य न केल्यामुळे सरकारी वकीलांनी त्याचा सखोलवार उलटतपास नोंदविला. मात्र, तरी देखील त्याने अभियोग पक्षाच्या कथनास सहाय्य केलेले नाही.

**११.** सरकारपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सा. क्र. १ संतोष सावळे याने हे स्पष्टपणे नाकारले की, दि.२१/०६/२००८ रोजी त्यांच्या गावातील ग्रामपंचायत

सरपंचाची व उपसरपंचाची निवडणुक झाली होती त्यामुळे तो फटाके वाजवत होता, फटाके वाजवण्याच्या कारणावरुन त्याचे चुलते, चुलती चंद्रभागा यांच्यामध्ये व आरोपिंमध्ये भांडणे झाली होती व मिटली होती, दि. २३/०६/२००८ रोजी ते जेवण करुन झोपले असता रात्री ११ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घराचे दार ठोठावले व चार इसमांनी त्यांना शिवीगाळी व दमदाटी करुन हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली, त्याचा ओरडण्याचा आवाज ऐकल्यानंतर त्याचे आई वडील जागी झाले व त्यानंतर आरोपी राजु सावळे याने त्याच्या वडिलांच्या दोन्ही पायांवर काठीने मारहाण केली, आरोपी राजू सावळे याने लोखंडी पट्टीने त्याच्या वडिलांच्या डाव्या खांदयावर मारहाण करुन खांदयाचे हाड मोडले, इतर तीन आरोपींनी त्याची आई सुभद्रा हिस मारहाण करुन दमदाटी केली, आरोपींनी घरातील सामानाची नासधूस केली व बाहेर उभी असलेली मोटरसायकलच्या काचा फोडल्या, आरोपींनी त्यांना गावामध्ये कसे राहता असे म्हणून दमदाटी केली, मारहाणीनंतर त्याने आरोपिंविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती हे त्याने स्पष्टपणे नाकारले आहे. तसेच त्याने हे मान्य केले की, त्याच्यामध्ये व आरोपींमध्ये तडजोड झालेली आहे. त्याची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नाही.

**१२.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये अ. सा. क्र. १ याने मान्य केले की, दि. २१/०६/२००८ रोजी सायंकाळी चार इसम आले होते व त्यांनी त्यांचे तोंड बांधलेले असल्यामुळे तो त्यांना ओळखत नव्हता, त्याला व त्याच्या आई वडिलांना मारहाण करतेवेळी आरोपींनी तोंड बांधलेले असल्यामुळे तो त्यांना ओळखत नाही, त्याने आरोपींविरुध्द गैरसमजुतीमुळे तक्रार नोंदवली होती, त्याची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नाही, त्याच्या आई वडिलांची देखील आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नाही, त्याला आरोपीविरुध्द केस चालवायची नाही.

**१३.** सबब अभियोग पक्षाच्या एकंदरित कथना विषयी संशय निर्माण होतो. त्यामुळे सरकार पक्षाची केस निसंशयपणे शाबीत झालेली नाही. त्यामुळे वरील विवेचन विचारात घेता अभिलेखावर आरोपीस दोषी ठरवावे इतपत ठोस पुरावा उपलब्ध नसलेने आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ६ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र. ७ करीता

खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. **आरोपी क्र. १ संदिप रामदास मोरे, २. रामदास दशरथ मोरे, ३. रतन बबन सावळे, ४.राजू यशवंत सावळे** यांची भारतीय दंड संहिता कलम ३२५,३२३,४५२,४२७,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करणेत येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी संहिता कलम ४३७ (अ) अन्वये रक्कम रु. २५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

४. गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक दोन बांबूच्या काठया व एक लोखंडी पट्टी मुल्यहिन असल्यामुळे अपिलीय कालखंड संपल्यानंतर नाश करण्यात यावे.

५. सदर न्यायनिर्णय फौजदार प्रक्रिया संहिता कलम ३५३ (१) नुसार खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात येत आहे.

VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2026.08.11 17:41:27 +0530

**दि.११/०८/२०२६** **(श्री. व्ही.आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**वडगाव मावळ, पुणे.**

Visit ecourts.gov.in for updates or download mobile app "eCourts Services" from Android or iO

**CERTIFICATE**

I affirms that the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original order.

Name of Steno : M. B. Ingole (Grade-III)
Court Name : Shri. V.R. Doifode, 4th
J.M.F.C. Vadgaon Maval, Pune.
Date of order : 11.08.2026
Order signed by P.O. on : 11.08.2026
Order uploaded on : 11.08.2026